(121)

राज्यातील खाजगी संस्थांना सन १९९९-२०००या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय, क्रमांक : पीईसी-२०९९/५३४५८(२६९/९९) तांशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ५ जुलै, १९९९.

संदर्भ : (१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची क्रमांक : एफ.७४२/ ६(एमएस) / इटी / ९९, दिनांक १/७/९९ चे पत्र.

शासन निर्णय : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी त्यांच्या संदर्भाधीन दिनांक १/७/१९९९ च्या पत्रान्वये राज्यातील कांही खाजगी संस्थांना सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्यासाठी काही अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची सदर मान्यता विचारात घेता संबंधित संस्थांना सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये खालील खाजगी संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदवी अभ्यासक्रमासह व प्रवेश क्षमतेसह सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून कायम स्वरुपी विना अनुदान तत्वावर नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे. :-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | पी. ई. एस. मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शिवाजीनगर, पुणे-५ | १) मेकॅनिकल इंजि.<br>२) कॉम्प्यु. इंजि.<br>३) इलेक्ट्रॉ.ॲन्ड टेलिकम्यु. | ६०<br>६०<br>६० |
| | मॉडर्न एज्यु. सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे-४११ ००१ | १) मेकॅनिकल इंजि.<br>२) कॉम्प्यु. इंजि.<br>३) इलेक्ट्रॉ.ॲन्ड टेलिकम्यु. | ६०<br>६०<br>६० |
| ३. | इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोसायटी ऑफ सेंट फ्रान्सिस इंडस्ट्रीयल ट्रेनिंग सेन्टर, [illegible] (प्र.), मुंबई - | १)इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी<br>२) कॉम्प्युटर इंजि.<br>३) इलेक्ट्रॉ. ॲन्ड टेलिकम्यु. | ६०<br>६०<br>६० |
| ४ | कॉलेज ऑफ इंजि. टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी रोड, अमरावती. | १) इलेक्ट्रॉ.ॲन्ड टेलीकम्यु.इंजि<br>२) कॉम्प्यु. इंजि.<br>३) इंन्स्ट्रमेंटेशन | ६०<br>६०<br>६० |

Modern Education Society's College of Engineering Pune-1.

PRINCIPAL
Modern Education Society's
College of Engineering
Pune - 411 001.

(122)

सदर मान्यता ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच शासनाने दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.
२. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. व संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्र शिक्षण संचालकांच्या संमतीने संस्थेकडून समाधानकारकरित्या करण्यात येतील.
३. प्रस्तावित अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणास संस्थेने संबंधित विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे.
४. संबंधित संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई-१ यांच्याकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशिर बाबींची पूर्तता करावी.
५. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासनाने सन १९९३-९४ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार संबंधित संस्थांचे प्रवेश संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत करण्यात येतील.

३. वरील आवश्यक त्या औपचारिक बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१ यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांनी याबाबत आवश्यक त्या नोंदी अभ्यासक्रम, विषय नोंद वहीत ठेवाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र. द. क्षीरसागर)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / अमरावती
कार्यासन अधिकारी /मांशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
संबंधित संस्थेस

प्रत माहितीसाठी :-
१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत शासन, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्प्लेक्स, आय. पी. इस्टेट, नवी दिल्ली-११० ००२
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल अॅशुरंस बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
३. निवड नस्ती, तांशि-१

Modern Education Society's College of Engineering Pune-1.

PRINCIPAL
Modern Education Society's
College of Engineering
Pune - 411 001.